NEWS IN SAKAL

DATE- 18th January, 2010

# स्वयंचलित टँकर भरणा केंद्र आता चतुःशृंगीतही

## लवकरच रामटेकडी, वडगाव शेरीतही सुरू होणार

सकाळ वृत्तसेवा

येरवडा, ता. १७ : पाण्याच्या टँकरवर नियंत्रण ठेवण्यासाठी, पाण्याचा अपव्यय टाळून महापालिकेच्या महसुलात वाढ करण्यासाठी वंडगार्डन पाणीपुरवठा विभागाअंतर्गत स्वयंचलित संगणकीकृत पिण्याच्या पाण्याचे टँकर भरणा केंद्र येरवड्यासह चतुःशृंगी येथे सुरू झाले असून लवकरच रामटेकडी आणि वडगाव शेरी या ठिकाणी सुरू करणार असल्याची माहिती विकास अभियंता प्रमोद निरभवने यांनी दिली.

महापालिकेतर्फे संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयाशेजारी नुकतेच या टँकर भरणा केंद्राचे उद्‌घाटन झाले. या वेळी सहायक अभियंता रवींद्र ढवळे, एस. साळुंखे, अॅक्वामेस इन्स्ट्रुमेंट्‌सचे झपे उपस्थित होते.

निरभवने म्हणाले, "टँकर भरणा केंद्रावर पूर्वी 'फ्लोमीटर' नसल्यामुळे पाण्याचे मोजमाप होत नव्हते. त्यामुळे पालिकेचा महसूल वसूल होत नसे. आता स्वयंचलित यंत्रणा बसविल्यामुळे पाण्याचे मोजमाप, व्हॉल्व्ह चालू-बंद करणे इत्यादी गोष्टी स्वयंचलित असल्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळण्यास व पालिकेचा महसूल वाढविणे शक्य झाले आहे. ही यंत्रणा अॅक्वामेस इन्स्ट्रुमेंट्‌स कंपनीने बसविली आहे."

### शहरात दहा टँकर भरणा केंद्रे

**पुणे महापालिका पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरने पाणीपुरवठा करते. शहरात दहा टँकर भरणा केंद्रे असून दररोज महापालिकेच्या आणि खासगी २५० टँकरमधून पाणीपुरवठा केला जातो. यासाठी महापालिका दर वर्षी अर्थसंकल्पात एक कोटी रुपयांची तरतूद करते.**

प्रत्येक टँकरधारकास 'स्मार्ट कार्ड' देण्यात आले आहे. हे कार्ड नियंत्रण कक्षात बसविलेल्या यंत्रात टाकल्यास जेवढे पाणी घेतले जाईल, त्यानुसार निर्धारित दराने आकार घेऊन टँकरमध्ये अपेक्षित पाणी भरले जाणार आहे. या यंत्रणेमुळे दैनंदिन पाण्याचे तंतोतंत मोजमाप, तसेच संभाव्य नोंदी स्वतंत्र ठेवण्यात येणार आहेत. दिवसभराच्या नोंदीसुद्धा संगणकीकृत होणार आहेत. अशा प्रकारची यंत्रणा ही भारतातील पहिलीच असून याची सुरवात महापालिकेकडून पुणे शहरात करण्यात येत असल्याचे निरभवने यांनी सांगितले.

